राज्यातील विविध जिल्हयातील पुर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या नागरिकांना विशेष दराने मदत देण्याबाबत ..

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : सीएलएस-२०१९/प्र.क्र.१५७/म-३

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

तारीख:- ११ सप्टेंबर, २०१९

संदर्भ: १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: सीएलएस-२०१९/ प्र.क्र.१५७/ म-३, दिनांक ८/८/२०१९, दिनांक १२/८/२०१९,दिनांक १६.८.२०१९ व दिनांक २२.८.२०१९.

२) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे क्र. लेखामेळ/आरसीएन-२ / २२४५२१९४/ उप.प्र (Partly) /२०१९-२०/२०१९/४४६, दि. ११/९/२०१९ चे पत्र.

प्रस्तावना :

राज्यातील विविध जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागामध्ये दिनांक २६.७.२०१९ रोजी व त्यांनतर झालेल्या अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी शहरी व ग्रामीण भागामध्ये पसरले. या पुर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या कुटुंबियांना मदत देण्यासंदर्भात दिनांक ३०.७.२०१९ व दिनांक ७.८.२०१९ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत पुर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या नागरिकांना विशेष दराने मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. यास अनुसरुन, संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त, कोकण यांना रु. ५७.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांनी संदर्भ क्रमांक २ येथील पत्रान्वये केलेल्या मागणीनुसार अतिरिक्त निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

दिनांक २६.७.२०१९ रोजी व त्यांनतर राज्यात विविध जिल्हयात निर्माण झालेल्या पुरपरिस्थितीमुळे घरात पाणी शिरल्यामुळे झालेल्या नुकसानीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) व राज्य शासनाकडून वाढीव मदत अनुज्ञेय करून एकूण मदत देण्यास प्राप्त झालेल्या शासन मान्यतेनुसार विभागीय आयुक्त, कोकण विभाग,मुंबई यांनी मागणी केलेला पुढील तक्त्यात नमूद केलेला निधी वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	नियंत्रक अधिकारी	जिल्हा	०२, पूर, चक्रीवादळे, इत्यादी, १०१ अनुग्रह सहाय्य (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च, (९२)(०१) रोख भत्ता, मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना सहाय्य व जखमींना मदत (अनिवार्य),३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) **(२२४५ २१९४)** **(रक्कम रुपयात)**
१	२	३	४
१	**विभागीय आयुक्त, कोकण विभाग**	**ठाणे**	१२,६४,००,०००
		एकूण	**१२,६४,००,०००**

उपरोक्त दराने देण्यात येणारी अतिरिक्त मदत ही केवळ याच घटनांसाठी मर्यादित राहील. ही बाब अन्य प्रकरणी पुर्वोदाहरण म्हणून समजण्यात येऊ नये. तसेच प्रस्तुत निधी वितरीत करतांना दि.८/८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयामधील अटी व शर्तीची पूर्तता करण्यात यावी.

२. राज्य शासनाकडून द्यावयाच्या वाढीव मदतीसाठी होणारा खर्च प्रधान लेखाशीर्ष- २२४५- नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय, ०२ पुर चक्रीवादळे इत्यादी, १०१, अनुग्रह सहाय्य , (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च, (९२) (०१) रोख भत्ता मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना सहाय्य व जखमींना मदत, ३१ सहाय्यक अनुदाने (२२४५ २१९४) या लेखाशीर्षाखाली भागविण्यात यावा. या लेखाशीर्षाखाली वरील विवरणपत्रामध्ये दर्शविल्यानुसार निधी जिल्हयांना विभागीय आयुक्तांमार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. कक्ष अधिकारी (म-११) यांनी सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करावा.

३. सदर निधी प्राप्त झाल्याबरोबर बाधित कुटुंबांना तात्काळ वितरीत करण्यात यावा. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वर्ग करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर होत आहे याची विभागीय आयुक्त यांनी खातरजमा करावी. निधी वाटपाचे लेखे, अभिलेखे, नोंदवह्या विहित कार्यपध्दतीनुसार अनुदान आहरीत व वितरीत होणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर अद्ययावत ठेवण्यात याव्यात. झालेल्या खर्चाची महालेखापाल कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या खर्चाशी पडताळणी करुन त्याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्र या विभागाकडे तात्काळ सादर करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत मंजूर निधीच्या मर्यादेपक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. वितरीत अनुदानातून जर काही रक्कम खर्ची पडणार नसेल तर ती विहित वेळेत शासनास प्रत्यार्पित करावी.

४. विभागीय आयुक्त, कोकण यांनी संबधितांना निधी वितरीत केल्यानंतर एकूण वितरीत निधीच्या ७५ टक्के रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त झाल्यानंतरच यापूढील निधी मागणीबाबत कार्यवाही करावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१३१२२८५७६९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.09.13 12:40:45 +05'30'

(सु. ह. उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधान परिषद), विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
३. महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय विधान सभा/विधान परिषद सदस्य,
४. अपर मुख्य सचिव (वित्त),मंत्रालय,मुंबई,
५. विभागीय आयुक्त, कोकण, मुंबई
६. जिल्हाधिकारी, ठाणे
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
८. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
९. संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई/ ठाणे
११. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१२. कार्यासन अधिकारी (म-११/म-३), मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१३. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
१४. निवड नस्ती (कार्यासन/ म-३).